महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर - ४४० ०२२
दुरध्वनी क्र. ०७१२-२८७०१२०/२१ CIN - U85300PN2019NPL187405 ई-मेल - mahajyotingp@gmail.com

जा.क्र.महाज्योती/नागपूर/आस्था/४९१/२०२५-२६ दिनांक :- १८/०३/२०२६

# परिपत्रक

**विषय :-भटक्या जमाती क प्रवर्गातील धनगर समाजातील विद्यार्थांकरिता राबविण्यात येणाऱ्या महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा) परीक्षा पूर्व प्रशिक्षण २०२५-२६ करिता दुसरी प्रतिक्षा यादी.**

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात महाज्योती संस्थेमार्फत राबिण्यात येणाऱ्या भटक्या जमाती क प्रवर्गातील धनगर समाजातील विद्यार्थांकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा) परीक्षा पूर्व प्रशिक्षणाकरिता पात्र विद्यार्थाची निवड व प्रतिक्षा यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करून निवड झालेल्या विद्यार्थांना संबंधित प्रशिक्षण संस्थेत रुजू होण्याकरिता सूचना देण्यात आलेली होती. तसेच निवड झालेल्या विद्यार्थांना प्रशिक्षण संस्थेत अनियमितपणे हजर असल्यास त्यांचे प्रवेश रद्द करून पुढील प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात येईल असे देखील कळविण्यात आलेले होते.

त्यानुसार सदर परीक्षापूर्व प्रशिक्षणाकरिता प्रशिक्षण संस्थेमार्फत प्राप्त अहवालानुसार प्रशिक्षण संस्थेत अनियमितपणे हजर असलेल्या विद्यार्थाचे प्रवेश रद्द करून सदर विद्यार्थाची यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्याद्वारे प्रवेश रद्द करण्यात आलेल्या विद्यार्थांच्या ऐवजी पुढील प्रतिक्षा यादीतील विद्यार्थाची निवड करून सदर परीक्षापूर्व प्रशिक्षणाकरिता दुसरी प्रतिक्षा यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत असून निवड झालेल्या विद्यार्थांना ज्ञानदीप अकॅडेमी, पुणे या प्रशिक्षण संस्थेत रुजू होण्याकरिता दि.२२/०३/२०२६ रोजी पर्यंत मुदत देण्यात येत आहे. **जे विद्यार्थी दि.२२/०३/२०२६ रोजी पर्यंत प्रशिक्षण संस्थेत रुजू होणार नाही अश्या विद्यार्थांचे प्रवेश रद्द करून पुढील प्रतिक्षा यादी प्रसिद्ध करण्यात येईल.** सर्व संबंधित विद्यार्थांनी याची नोंद घ्यावी.

**स्वा**
**(मिलिंद नारिंगे)**
**व्यवस्थापकीय संचालक**
**महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था,**
**(महाज्योती) महाराष्ट्र राज्य, नागपूर**